# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.11.2024** **वारःशुक्रवार**

---

•राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला; सर्वच पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांचे झंजावाती प्रचार दौरे

•सर्व राजकीय पक्षांनी विचारसरणीपेक्षा देशाला अधिक प्राधान्य द्यावं असं भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन

•सोयाबीनला सात हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव देण्याचं कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची घोषणा

•देशाच्या परंपरेत आदिवासी समुहाचं योगदान महत्वाचं असल्याचं राष्ट्रपती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचं प्रतिपादन

आणि

•राज्याच्या विविध भागात आज पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**<u>प्रचार</u>**

राज्यात विधानसभा प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. सर्वच पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या झंजावाती प्रचार दौऱ्यामुळे राज्यातलं वातावरण ढवळून निघालं आहे. त्याचवेळी ठिकठिकाणचे उमेदवार आणि कार्यकर्ते कोपरा सभा, मेळावे, प्रचार फेऱ्या आणि घरोघरी मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी घेत आहेत. कालही विविध पक्षांच्या राष्ट्रीय नेत्यांच्या राज्यात प्रचार सभा झाल्या.

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल राज्यात तीन ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. काँग्रेस आणि महाविकास आघाडी सत्तेत आली तर आरक्षण हटवेल, असा आरोप मोदी यांनी काल मुंबईत शिवाजी पार्कवर घेतलेल्या सभेत केला. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी यांची एकजूट तोडण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. हे लोक आपापसात लढले तर काँग्रेस मजबूत होईल, असा दावा त्यांनी या सभेत केला. सर्व राजकीय पक्षांनी विचारसरणी पेक्षा देशाला अधिक प्राधान्य द्यावं असं आवाहन त्यांनी केलं. या विधानसभा निवडणुकीतील पंतप्रधानांची ही राज्यातील शेवटची प्रचारसभा होती. यावेळी त्यांनी जमलेल्या कार्यकर्त्यांना महायुतीच्या उमेदवारांना जिंकून देण्याचं आवाहन केलं आणि त्याचवेळी महायुती सरकारच्या शपथविधीचं आमंत्रण दिलं.

शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले, यांच्यासह महायुतीचे इतर नेते यावेळी उपस्थित होते.

दरम्यान मोदी यांची काल नवी मुंबईत खारघर इथंही सभा झाली. महाराष्ट्राचा विकास हीच महायुतीची प्राथमिकता असून महाराष्ट्र राज्य विकसित भारताचं ग्रोथ इंजिन होईल, असं प्रतिपादन मोदी यांनी यावेळी केलं.

तर महायुतीचं सरकार पुन्हा सत्तेवर आल्यास पुढील पाच वर्षात महाराष्ट्र विकासाची नवी क्षितीजं पादाक्रांत करेल, असा विश्वास मोदी यांनी छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या जाहीर सभेत व्यक्त केला. महायुती सरकारच्या जलयुक्त शिवार योजनेमुळे मराठवाड्यातलं जलसंकट दूर झालं आहे, असं ते म्हणाले.

भाजप नेते, आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही काल धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग इथं, सांगली जिल्ह्यात पलूस कडेगाव आणि कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी इथं महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतली.

यंदाची निवडणूक ही जनतेच्या भवितव्याचा निर्णय घेणारी निवडणूक आहे, असं सांगत महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

विकसित महाराष्ट्रासाठी महायुती सरकार राज्यात पुन्हा आलं पाहिजे, असं प्रतिपादन गोवा राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केलं. यावेळी त्यांनी केंद्र सरकार आणि राज्यातील महायुती सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली; आणि विरोधकांवर जोरदार टीकाही केली.

कॉँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि वरिष्ठ नेते राहुल गांधी यांनीही राज्यात प्रचार सभा घेतल्या. महाराष्ट्रात सत्तेत आल्यास शेतकऱ्यांचं तीन लाखापर्यंतचे कर्ज माफ केलं जाईल," अशी घोषणा राहुल गांधी यांनी केली. नांदेड आणि नंदुरबार इथं महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. महाराष्ट्रात सरकार आल्यास महालक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दरमहा ३ हजार रुपये दिले जातील, जातीय जनगणनेचे काम पूर्ण केले जाईल, अशी आश्वासनंही राहुल गांधी यांनी दिली.

सत्ताधारी विकासाचे मुद्दे न देता केवळ कॉँग्रेस आणि गांधी घराण्यावर टीका करत आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडी सरकारच्या हातात राज्य दिल्यास आम्ही विकासाला गती देऊ, असं आश्वासन मल्लिकार्जुन खरगे यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिलं. विदर्भामध्ये सोयाबीनला सात हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव देऊ, तसंच कॉँग्रेस सरकारने आपल्या जाहीरनामा विकासाची जी पंचसूत्री मांडली आहे, त्याची पूर्तता करू, असंही खर्गे यांनी यावेळी नमूद केलं.

खर्गे यांनी काल इगतपुरी इथंही प्रचार सभा घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीनं महाराष्ट्राच्या लोकांना खोटी आश्वासनं दिल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला, आणि महायुतीच्या सरकारवर टीका केली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघातील सांगवी इथं प्रचार फेरी घेतली. तर पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी काल नवी मुंबईत प्रचार सभा घेतळी.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं तसंच अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीगोंदा आणि नेवासे इथं जाहीर सभा घेतल्या. तर पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी काल दापोली इथं सभा घेतली.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यातल्या खडकवासला मतदारसंघात काल सभा घेतली.  या सभेत त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि महाविकास आघाडीवर टीका केली.

हे प्रादेशिक बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात ...

**<u>मतदान जनजागृती</u>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात ठीकठिकाणी मतदान जनजागृती अभियानही राबवलं जात आहे. धाराशिव जिल्ह्यात प्रशासनाच्या वतीनं काल ‘वॉक फॉर व्होट’ या प्रभात फेरीचं आयोजन केलं होतं. शहरातल्या सर्व शाळांमधल्या विद्यार्थ्यांनी यात मोठ्या संख्येनं सहभाग घेतला.

तुळजापूर इथं विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून मतदान जनजागृती केली.

हिंगोली जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी दुचाकी फेरी काढण्यात आली.

परभणी शहरात काल ‘रन फॉर वोट’ ही फेरी काढण्यात आली.

महाबळेश्वर तालुक्यात मतदान जनजागृती रथाच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचं महत्त्व सांगण्यात आलं.

अभिनेता सुबोध भावे यांनीही राज्यातील मतदारांना आवर्जून मतदान करण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले,

**<u>जन जाती दिवस</u>**

आदिवासी समुदायाचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आज देशभरात जनजातीय गौरव दिवस साजरा करण्यात येत आहे. या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी काल देशवासीयांना संदेश दिला. देशाच्या परंपरेत आदिवासी समुहाचे योगदान महत्वाचे असून सध्या आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबवल्या जात असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी समाजाचे योगदान महत्त्वाचे असून भगवान बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली लढला गेलेला संघर्ष येणाऱ्या काळात प्रेरणादायी असेल असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या.

**<u>नेहरू जयंती</u>**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त काल राज्यात सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात आलं. पंडित नेहरू यांची जयंती बालदिन म्हणूनही साजरी केली जाते,

त्यानिमित्त अनेक शाळांमध्ये, तसंच स्वयंसेवी संस्था संघटनांनी लहान मुलांसाठी विविध उपक्रमांचं आयोजन केलं होतं.

आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांचीही काल जयंती होती. त्या निमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि लहुजी वस्ताद यांना अभिवादन करण्यात आलं.

**<u>कार्तिकी पौर्णिमा</u>**

शिखांचे धर्मगुरू गुरु नानक यांची आज जयंती आहे. या निमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. आज कार्तिकी पौर्णिमा देखील आहे; त्यामुळे राज्यात ठीकठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>निधन</u>**

नाशिक जिल्ह्यातले माजी खासदार हरिश्चंद्र देवराम चव्हाण यांचं काल सकाळी नाशिक इथं निधन झालं, ते ७३ वर्षांचे होते. पेठ-सुरगाणा मतदारसंघातून ते सुरुवातीला अपक्ष आमदार म्हणून निवडून आले होते, त्यानंतर काँग्रेसकडून एकदा तर भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर सलग दोन वेळा खासदार म्हणून ते निवडून आले होते.

**<u>क्रीडा</u>**

बिहारमधे सुरु असलेल्या, महिलांच्या आशियाई हॉकी करंडक स्पर्धेत काल भारतानं थायलंडवर १३-० असा विजय मिळवला. भारतातर्फे दिपीकानं चमकदार कामगिरी करत ५ गोल नोंदवले. या स्पर्धेतला भारताचा हा सलग तिसरा विजय आहे.

**<u>नेमबाजी</u>**

पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात पाचवी राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धा सुरू आहेत. काल दुसऱ्या दिवसाखेर १० मीटर एअर पिस्टल एच एस १ महिला गटाच्या अंतिम सामन्यात दिल्लीच्या भक्ती शर्मा हिने सुवर्ण पदक पटकावले; तर राजस्थानच्या श्रृष्ठी असोरानं रौप्य पदक पटकावला. पॅरिस पॅरालिंपिकमध्ये कास्य पदक मिळवणारी मध्य प्रदेशची रूबिना फ्रान्सिस सातव्या क्रमांकावर फेकली गेली. १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स एच एस १ गटात राजस्थानच्या मोना अग्रवाल हिने सुवर्ण कामगिरी केली; तर महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकर याने रौप्य पदक पटकावले.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे तर विदर्भात तुरळक ठिकाणी घट झाली आहे. येत्या 24 तासात विदर्भ वगळता राज्यात सर्वत्र तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**